# संगीतातून आनंदनिर्मिती

**डॉ.जयश्री विश्राम कुळकर्णी**

स्व.छगनलाल मुलजीभाई कढीकला महाविद्यालय, अचलपूर कॅम्प.अमरावती

---

**प्रस्तावना :**आनंद ही सुखाची परमोच्च अवस्था आहे. आनंद होतो म्हणजे नेमकं होतं तरी काय? तर मनाला अतीव सुखाची व शांतीची जाणीव होते. आशुतोष शेवाळकर म्हणतात - आनंद ही पूर्णपणे स्वनिर्मित गोष्ट आहे. व्यायाम करायला माणूस ठेवून जसं आपलं शरीर सुदृढ होऊ शकत नाही तसच इतर कोणी आपल्यासाठी आनंदाची निर्मीती करु शकत नाही. कुठलही बाह्य कारण नसतांना चित्तात एकवटून येतो तोच खरा आनंद. मनासारखे सर्व जुळून आले तर मनं आनंदीत होते. असा आनंद आपणांस केव्हा होतो? खूप परिश्रम करुन विद्यार्थ्यांना जेव्हा यश मिळतं तेव्हा होतो. यशस्वीपणे जबाबदारी पूर्ण केल्यावर आनंद होतो. तरुण मुलामुलींना आपले लग्न ठरल्यावर होतो. तसेच नवदाम्पत्याला अपत्य प्राप्ती झाल्यानंतर होतो. परदेशगमन योग, सत्कार समारंभ, जनमान्यता इत्यादी आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांवर असतांना अतीव आनंद होते. कविता केल्यावर होतो, तर डॉक्टरला एखादी मोठी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्यावर होतो. एखाद्या मोठ्या व्यापाऱ्याला मोठ्या नफ्याचा सौदा केल्यावर होतो.

**विषय :**जीवन गतीमान बनविण्यात आनंद फार मोठी भूमिका बजावीत असतो. जीवन गतीमान असण्याला फार मोठा अर्थ आहे. जीवनाची गती कमी झाली की, जीवनचक्र मंद फिरु लागते, आणि मग ते कंटाळवाणे व तेचतेपणाचे होऊ लागते. माणसाला नेहमी बदल हवे असतात. बदलही चांगले व सुखावह असावे लागतात. जीवनांत बदल असला की, जीवन गतीमान बनते. जीवनात तोचतोपणा व रटाळपणा कमी करण्यासाठी विरंगुळ म्हणून माणूस बरेच छंद जोपासतो. उदा.बागकाम, शिल्पकला, चित्रकला, खेळ, शब्दकोडी सोडवणे इत्यादी बदल किंवा छंद हे शेवटी आनंद निर्मितीच करीत असतात. ओंकारातून संगीताची निर्मिती झाली आहे. संगीत हे जीवनव्यापी आहे, संगीत आणि आनंद यांचा संबंध दोन प्रकारांनी येतो. संगीत हे आनंद देतेच पण इतर गोष्टींपासून झालेला आनंद व्यक्त करण्यासाठी सुद्धा प्रतीक म्हणून संगीत वापरले जाते. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर संगीत आपले स्वागत करीत असते. लहान बाळाला झोपविण्यासाठी अंगाई गीताने संगीत प्रकट होते. सनईचे मंजूळ सूर लग्नसमारंभ आनंददायी बनवितात.संगीत आनंद देऊन जीवन सुसह्य करते. शेतात काम करतांना शेतकरी लोकगीते म्हणून तर मोट ओढतांना मोटेवरची गाणी म्हणून शरीर आणि मनावरचा ताण कमी करीत असतो. खेडेगावांत पूर्वी जात्यावर दळतांना स्त्रिया जात्यावरची गाणी व ओव्या म्हणत असत. शहरातील लोक वेगवेगळ्या माध्यमातून गाणी ऐकून आपला क्षीण दूर करतात. उदा.रेडिओ, दूरदर्शन, सी.डी.प्लेअर, टेपरेकॉर्ड इत्यादी. तर

कुणी लोकं लतादीदी व आशाताईंच्या जादुई आवाजातील गाणी ऐकून आलेला सर्व ताणतणाव दूर करुन पुनश्च कामाला लागतात. मंद आवाजात वाद्य संगीत ऐकून इंजिनिअरींग व मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी अभ्यास करतांना दिसतात. तर भाविक लोक देवळांत जाऊन भजन व कीर्तनात आनंदाने डोलू लागतात. संगीतापासून मिळणारा आनंद हा उच्चकोटीचा असतो. चांगले संगीत ऐकले म्हणजे मनावर व शरीरावर चांगलाच प्रभाव पडतो. संगीताने मनं उल्हासीत होते तर शरीर पुलकीत होते. उच्चकोटीचे संगीत ऐकल्याने उच्चप्रतीच्या आनंदाची अनुभूती होते. संगीत स्वर्गातून पृथ्वीवर आले आहे त्यामुळे देवही संगीतापासून मिळणारा आनंद लुटतात. एकदा नारदांनी भगवान विष्णुंना एक प्रश्न केला की - हे देवा तुम्हाला कुठे जास्त राहायला आवडते? तेव्हा भगवान श्री विष्णुंनी उत्तर दिले की -

नाहं वसामि वैकुंठे | योगीनां ह्रदये न च ||
मद्‌भक्ता यत्र गायन्ति | तत्र तिष्टति नारद ||

याचा अर्थ असा की, मी वैकुंठात नसतो, योगीजनांच्या ह्रदयातही नसतो पण माझे भक्त जिथे गायन करीत असतात तेथे मात्र मी सदैव असतो. श्री नृसिंह सरस्वतींनी आपल्या भक्तांना सांगितले की,

नित्य जे गायन करिती | त्यावर माझी अतीप्रिती ||
त्यांच्या घरी अखंडिती | आपण असे अवधारा ||

चांगल्या कीर्तनकाराला स्वर-तालाची जाणीव असते म्हणूनच श्रोते कीर्तनाचा आनंद लुटू शकतात. भावना, अनुभव प्रतिबिंबित करण्याची शक्ती संगीतातच आहे. दु:खी गाणे ऐकल्याने सुद्धा आपल्याला आनंद मिळतो कारण आपल्याला कधी काळचे विसरलेले दु:ख त्या गाण्यातून प्रतिबिंबित होत असते. दु:ख, भावना, आनंद ह्या जाणीवा आहेत आणि ह्या जाणीवा जेव्हा एखाद्या कलाकृतीच्या माध्यमातून प्रतिबिंबित होतात, तेव्हा त्यांचे रुपांतर हे आनंदातच होत असते. ध्वनीक्षेपणाच्या प्रभावी आणि अमर्याद शक्तीमुळे एकाच वेळी हजारो लोक उच्चकोटीच्या कलाकारांच्या कलाविष्काराचा आनंद लुटू शकतो. आज संगीत हे दरबारातून, कलावंतीणीच्या कोठ्यावरुन निघून जनसामान्यांत रुढ झाले आहे. संगीताबद्दल समाजात आदराची व आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे. संगीत ही वैश्विक भाषा आहे. संगीतापासून मिळणारा आनंद हा अखिल विश्वातील कुठलाही माणूस लुटू शकतो. संगीतातील आनंद हा धर्म, भाषा, जात-पात, पंथ ह्यांच्या पलीकडे नेऊन विश्वबंधूत्वाचा संदेश देतो.

**निष्कर्ष :** संगीतापासून मिळणारा आनंद हा साधकाला मोक्षप्राप्तीचा लाभ करुन देतो.

**संदर्भ:**
१) आनंद साधकांनो - लेखक आशुतोष शेवाळकर, दैनिक सकाळ, २३ फेब्रुवारी २०१२

२) संगीत निबंधावली - किरण फाटक, संस्कार प्रकाशन, मुंबई.